शनिवार दि. १७ ऑक्टोबर २०२६ ● जालना ● वर्ष ८ वे ● अंक ४५ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना (मेन रोड)
एका छताखाली आरोग्य सेवा
डॉ. आनंद मान्ने Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

### गाळे किती, व्यवहार किती अन् शेतकऱ्यांना काय मिळाले? जालना बाजार समिती चर्चेत

## जालना बाजार समितीत एक हजार कोटींचा घोटाळा

### आमदार अर्जुन खोतकर यांच्यावर माजी आमदार कैलास गोरंट्याल यांचा हल्लाबोल

**जालना - प्रतिनिधी**

जालना कृषी उत्पन्न बाजार समितीतील कथित आर्थिक अनियमितता, गाळेवाटप, जागांचे व्यवहार आणि कोल्ड स्टोरेजच्या वाटपावरून राजकीय वातावरण तापले आहे. बाजार समितीत जवळपास एक हजार कोटी रुपयांचा घोटाळा झाल्याचा गंभीर आरोप माजी आमदार कैलास गोरंट्याल यांनी केला आहे. या प्रकरणाची सविस्तर चौकशी व्हावी, यासाठी शासनाकडे तक्रार करण्यात येणार असून, कारवाई न झाल्यास न्यायालयात दाद मागणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला. बाजार समितीतील कथित गैरव्यवहारांची लढाई आता आपण हाती घेतली असून, त्यासाठी आवश्यक तयारी सुरू असल्याचे गोरंट्याल यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

आमदार अर्जुनराव खोतकर यांनी आपल्यावर केलेल्या टीकेला प्रत्युत्तर देताना गोरंट्याल यांनी बाजार समितीसह जालना खरेदी-विक्री संघ आणि सहकारी साखर कारखान्याच्या कारभारावरही प्रश्न उपस्थित केले. बाजार समितीच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे हित साधले जात असल्याचा दावा केला जात असताना प्रत्यक्षात शेतकऱ्यांना कोणत्या सुविधा मिळाल्या, त्यांना गाळे उपलब्ध झाले का आणि बाजार समितीतील व्यवहारांमधून शेतकऱ्यांचा फायदा झाला का, असे सवाल त्यांनी उपस्थित केले. या पत्रकार परिषदेला शेतकरी, काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी तसेच भाजपचे काही पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी शेतकरी प्रतिनिधींनीही बाजार समिती आणि सहकारी संस्थांच्या कारभारावर टीका केली.

बाजार समितीतील गाळेवाटपाचा मुद्दा उपस्थित करताना कैलास गोरंट्याल यांनी जवळपास एक हजार गाळे विकण्यात आल्याचा आरोप केला. या गाळ्यांपैकी किती गाळे प्रत्यक्ष शेतकऱ्यांना देण्यात आले, याचा खुलासा करण्यात यावा, अशी मागणी त्यांनी केली. शेतकऱ्यांच्या हितासाठी कार्यरत असलेल्या बाजार समितीत शेतमालाच्या खरेदी-विक्रीसाठी येणाऱ्या शेतकऱ्यांना सुविधा मिळणे अपेक्षित आहे. मात्र, बाजार समितीतील गाळेवाटपामध्ये शेतकऱ्यांना प्राधान्य देण्यात आले का, की पैसे देणाऱ्यांना जागा उपलब्ध करून देण्यात आल्या, असा प्रश्न गोरंट्याल यांनी उपस्थित केला. कापड दुकानांसह अन्य व्यावसायिकांना जागा देण्यात आल्याचा आरोप करत या व्यवहारांची चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली. गाळ्यांचे वाटप कोणत्या निकषांनुसार झाले, संबंधित जागांचे दर कसे निश्चित करण्यात आले, बाजार समितीला त्यातून किती उत्पन्न मिळाले आणि या व्यवहारांचा शेतकऱ्यांना नेमका काय फायदा झाला, याची माहिती सार्वजनिक करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांच्या वक्तव्यावरून स्पष्ट झाले. गूळ मार्केटमधील जागांच्या व्यवहारांचाही गोरंट्याल यांनी उल्लेख केला. चार व्यापाऱ्यांना सरकारी दरानुसार जागा दिल्याचे भासविण्यात आले; मात्र प्रत्यक्षात जागांचे व्यवहार प्रति चौरस फूट १० ते १५ हजार रुपयांच्या दराने झाल्याचा आरोप त्यांनी केला. या व्यवहारांमध्ये जागांचे मूल्यांकन, प्रत्यक्ष विक्रीदर, बाजार समितीला मिळालेली रक्कम आणि व्यवहारांसाठी वापरण्यात आलेली प्रक्रिया यांची चौकशी होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सूचित केले. संबंधित जागांचे अधिकृत दस्तऐवज, मंजुरीचे आदेश आणि आर्थिक नोंदी तपासल्याशिवाय या व्यवहारांतील वस्तुस्थिती स्पष्ट होऊ शकणार नाही. त्यामुळे बाजार समितीतील जागावाटप आणि विक्री व्यवहारांची स्वतंत्र चौकशी करून आर्थिक व्यवहारांचा तपशील समोर आणण्याची मागणी या आरोपांच्या केंद्रस्थानी आहे.



बाजार समितीतील कोल्ड स्टोरेज मित्राला दिल्याचा आरोपही गोरंट्याल यांनी केला. शेतमाल साठवणुकीसाठी कोल्ड स्टोरेजसारख्या सुविधा महत्त्वाच्या असताना त्याचे वाटप कोणत्या निकषांवर झाले, संबंधित प्रक्रियेत पारदर्शकता होती का आणि त्याचा शेतकऱ्यांना कितपत लाभ झाला, याबाबत त्यांनी प्रश्न उपस्थित केले. शेतकऱ्यांना शेतमालाची साठवणूक करता यावी, बाजारभाव अनुकूल होईपर्यंत माल सुरक्षित ठेवता यावा आणि विक्रीतून योग्य मोबदला मिळावा, यासाठी बाजार समितीने सुविधा उपलब्ध करून देणे अपेक्षित असते. त्यामुळे कोल्ड स्टोरेजच्या वाटपाची प्रक्रिया, कराराच्या अटी आणि त्यासंबंधीचे आर्थिक व्यवहार तपासण्याची गरज असल्याचे या आरोपांतून पुढे आले आहे. बाजार समितीत शेतकऱ्यांसाठी स्वस्त दरात भोजनाची व्यवस्था, स्वच्छतागृहे आणि इतर मूलभूत सुविधा असणे आवश्यक आहे. इतर बाजार समित्यांमध्ये पाच ते दहा रुपयांत भोजनाची सुविधा उपलब्ध असते; मात्र जालना बाजार समितीत अशा सुविधा नसल्याचा आरोप गोरंट्याल यांनी केला.

शेतमाल विक्रीसाठी बाजार समितीत येणाऱ्या शेतकऱ्यांना दिवसभर थांबावे लागू शकते. अशा वेळी पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, विश्रांतीची जागा आणि अल्पदरात भोजन मिळणे गरजेचे आहे. बाजार समितीच्या उत्पन्नाच्या तुलनेत शेतकऱ्यांना कोणत्या सुविधा दिल्या जात आहेत, याचा आढावा घेण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले.

बाजार समितीच्या उत्पन्नाचा विनियोग नेमका कुठे होतो आणि शेतकऱ्यांसाठी आवश्यक सुविधा (पान २ वर)

**'खोतकरांनीच शेतकऱ्यांची माफी मागावी' –लक्ष्मणराव घोडके**

रामनगर साखर कारखाना बचाव समितीचे कार्याध्यक्ष लक्ष्मणराव घोडके यांनी आमदार अर्जुन खोतकर यांच्या वक्तव्यावर आक्षेप घेत त्यांच्यावर टीका केली. जालना सहकारी साखर कारखाना हेतुपुरस्सर ताब्यात घेऊन शेतकऱ्यांवर अन्याय करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला. शेतकरी आर्थिक संकटाचा सामना करत असताना त्यांच्या नुकसानीला जबाबदार कोण, असा सवाल उपस्थित करत खोतकर यांनीच शेतकऱ्यांची माफी मागावी, अशी मागणी घोडके यांनी केली.

**धार्मिक कार्यक्रमातील नृत्याला वादाचे स्वरुप देणे अयोग्य – नारायण वाढेकर**

नारायण वाढेकर यांनी माजी आमदार कैलास गोरंट्याल यांच्या भूमिकेचे समर्थन करताना २०१३ मधील घटनांसह अन्य काही घटनांचा उल्लेख केला. गोरंट्याल हे लोकांना मदत करणारे व्यक्तिमत्त्व असल्याचे ते म्हणाले. आमदार अर्जुन खोतकर यांच्यावर जालना खरेदी–विक्री संघ आणि साखर कारखान्याच्या कारभाराबाबतही त्यांनी आरोप केले. बाजार समितीवर प्रशासक असतानाही प्रत्यक्ष कारभार कोण पाहतो, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. धार्मिक कार्यक्रमातील नृत्याच्या मुद्द्यावर बोलताना वाढेकर म्हणाले की, पुणे–मुंबईसारख्या शहरांमध्ये होणाऱ्या नृत्य कार्यक्रमांमध्ये महिलांवर पैसे उधळले जातात, त्याकडे दुर्लक्ष केले जाते. मात्र, धार्मिक कार्यक्रमातील नृत्याचा वेगळ्या पद्धतीने प्रचार करून त्याला वादाचे स्वरूप देणे योग्य नव्हते, असे मत त्यांनी व्यक्त केले.

## सेवा संकल्प अभियानांतर्गत नवीन जालना मंडळात चित्रकला, वक्तृत्व स्पर्धा व विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

### विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा उपक्रमांची गरज - दानवे

**जालना - प्रतिनिधी**

भारताचे यशस्वी पंतप्रधान मा. श्री. नरेंद्र मोदीजी यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित सेवा संकल्प अभियानांतर्गत भाजपा जालना महानगर च्या नवीन जालना मंडळाच्या वतीने आज (दि.१६) रोजी मुर्गीतलाव येथील मनपा शाळेत चित्रकला स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा व शालेय साहित्य वाटप कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी चित्रकला स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपल्या



कल्पकतेचे आणि कलागुणांचे दर्शन घडविले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या चित्रांची पाहणी करून त्यांचे कौतुक केले. विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांना शिक्षण, कला आणि विविध क्षेत्रांमध्ये प्रगती करण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले. यावेळी भाजपा जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, उपमहापौर राजेश राऊत, कार्यक्रमाचे आयोजक मंडळ अध्यक्ष सुनील भैया खरे, जिल्हा उपाध्यक्ष धनराज काबलिये (पान २ वर)

## जालन्यात कर्करोग, हृदयरोग उपचारांचा मार्ग मोकळा

### महिको ट्रस्टला ३ हेक्टर जागेवर सुविधा विस्ताराची मंजुरी; फडणवीस सरकारचा महत्त्वपूर्ण निर्णय

**जालना - प्रतिनिधी**

मराठवाड्यातील रुग्णांना गंभीर आजारांवरील उपचारांसाठी मोठ्या शहरांकडे धाव घ्यावी लागू नये आणि जालना जिल्ह्यातच अधिक व्यापक वैद्यकीय सुविधा उपलब्ध व्हाव्यात, या दृष्टीने महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. जालना येथील महिको रिसर्च फाऊंडेशन ट्रस्टच्या नेत्रालयालगत असलेल्या तीन हेक्टर शासकीय जमिनीवर नेत्रोपचारांव्यतिरिक्त विविध गंभीर आजारांवरील उपचार आणि वैद्यकीय शिक्षणाच्या सुविधा सुरू करण्यास राज्य सरकारने विशेष अटींसह परवानगी दिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यासंदर्भात निर्णय घेतल्याची माहिती देण्यात आली आहे.

या निर्णयामुळे जालना आणि परिसरातील रुग्णांना जनरल मेडिसीन, डायलिसिस, अस्थिरोग, कान-नाक-घसा, बालरोग, हृदयरोग, मेंदूविकार, रक्तविकार आणि कर्करोग यांसारख्या आजारांसाठी स्थानिक पातळीवर उपचार सुविधा उपलब्ध करून देण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. यासोबतच नर्सिंग, ऑप्टोमेट्री तसेच ऑपरेशन थिएटर टेक्निशियन आणि अनेस्थेशिया असिस्टंट यांसारख्या वैद्यकीय प्रशिक्षण अभ्यासक्रमांनाही परवानगीच्या अटींच्या अधीन राहून सुरुवात करता येणार आहे.

**नेत्रालयाच्या सेवेला धक्का न लावता आरोग्यसेवेचा विस्तार**

महिको रिसर्च फाऊंडेशन ट्रस्टच्या नेत्रालयामार्फत सध्या दिल्या जाणाऱ्या सेवांचे महत्त्व लक्षात घेऊन, त्या सेवांमध्ये कोणताही अडथळा निर्माण न करता अतिरिक्त वैद्यकीय सुविधा सुरू करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. त्यामुळे संबंधित तीन हेक्टर जागेचा वापर केवळ नेत्रोपचारांपुरता मर्यादित न राहता, विविध वैद्यकीय शाखांतील उपचार आणि त्यांच्याशी संबंधित प्रशिक्षणासाठी करता येणार आहे.

विशेषतः कर्करोग, हृदयविकार, मेंदूविकार आणि रक्तविकार यांसारख्या गंभीर आजारांवरील उपचारांसाठी अनेक रुग्णांना मोठ्या शहरांमध्ये जावे लागते. अशा उपचारांसाठी प्रवास, निवास आणि इतर खर्चांचा अतिरिक्त भार रुग्णांच्या कुटुंबांवर पडतो. जालन्यातच उपचारांच्या सुविधा विस्तारल्यास (पान २ वर)

## पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांची जालना जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीवर अधिकाऱ्यांशी चर्चा

### दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत, सामुहिक विवाह सोहळ्याला प्रोत्साहन द्या

**जालना - प्रतिनिधी**

जिल्ह्यातील दुष्काळाची तीव्रता लक्षात घेऊन पिण्याचे पाणी, जनावरांसाठी चारा आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी प्रभावी नियोजन करावे. पीक पंचनामे तातडीने पूर्ण करून शेतकऱ्यांना मदत मिळवून द्यावी, असे निर्देश राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी आज दिले. गांव दत्तक अभियानांतर्गत सर्वांगीण विकासासाठी अंतरवाली सराटी दत्तक घेत असल्याचे सांगून पुढील महिन्यात आपण या गावास भेट देणार असल्याचे त्यांनी सांगितले.

पालकमंत्री ना.पंकजाताई मुंडे आज जालना दौऱ्यावर होत्या, जिल्हाधिकारी कार्यालयात विभाग प्रमुखांच्या बैठकीत त्यांनी जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेतला, त्यावेळी त्या बोलत होत्या. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्ण कांत कनवारीया, मनपा आयुक्त अंजली शर्मा, पोलीस अधिक्षक तेगबीर सिंह संधु, अप्पर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, जि प चे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष बनसोडे, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, उपजिल्हाधिकारी मनिषा दांडगे, जिल्हा अधिक्षक, कृषि अधिकारी गहिनीनाथ कापसे आदी यावेळी उपस्थित होते.

यावेळी पालकमंत्री मुंडे पुढे म्हणाल्या की, जिल्ह्यातील ९५४ गावांमध्ये दुष्काळ परिस्थिती असून, या गावातील पीक पंचनामे पूर्ण झाले आहेत. पीकविमा प्रक्रियेतही पारदर्शकता व अचूकता राखण्याच्या सूचना देत, शेतकऱ्यांना पीक विम्याचा जास्तीत-जास्त लाभ मिळेल यासाठी प्रयत्न करावा असे निर्देश दिले.

**पिण्याचे पाणी, चाऱ्याचे नियोजन**

पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देत टँकरद्वारे होणाऱ्या पाणीपुरवठ्यावर जीपीएस प्रणालीने नियंत्रण ठेवावे, जलस्रोतांचे पुनर्भरण करावे तसेच नदी-



नाल्यांचे खोलीकरण करावे, असे त्यांनी सांगितले. पाणी वापरात दहा टक्के कपातीच्या आदेशांची प्रभावी अंमलबजावणी करावी आणि बांधकामांसाठी पिण्यायोग्य पाण्याचा वापर टाळावा, असेही निर्देश त्यांनी दिले.

जनावरांसाठी चारा उपलब्ध व्हावा यासाठी चारा साक्षरता अभियान राबवून मुरघास, हायड्रोपोनिक्स व अझोला चारा उत्पादनाचे प्रशिक्षण द्यावे. रोजगार हमी योजनेची कामे जलसंधारणाशी जोडून विहिरींची दुरुस्ती, गाळ काढणे आणि जलस्रोतांचे पुनर्जीवन यांना प्राधान्य द्यावे, असे मुंडे यांनी स्पष्ट केले.

**शेतकऱ्यांना मदत, सामुहिक विवाह सोहळ्याला प्रोत्साहन द्या**

दुष्काळ परिस्थितीत शेतकऱ्यांवर मानसिक ताण येऊ नये यासाठी गावपातळीवर मोठ्या प्रमाणावर समुपदेशन व संवाद उपक्रम राबवून त्यांचे मनोबल वाढवावे असे सांगत टंचाईच्या काळात सामुहिक विवाह सोहळ्यांना प्रोत्साहन द्या, पाणी पुरवठा योजनांची वसुली करताना मवाळ धोरण ठेवा असे त्या म्हणाल्या.

**सर्वांगीण विकासासाठी अंतरवाली सराटी गांव दत्तक**

'गाव दत्तक अभियान' अंतर्गत दुष्काळग्रस्त गावांना मदत देण्याच्या उपक्रमाचे त्यांनी स्वागत केले. या अंतर्गत सर्वांगीण विकास करण्याच्या उद्देशाने आपण अंतरवाली सराटी गाव दत्तक घेत असल्याचे (पान २ वर)

## 'हा दुष्काळ १९७२ च्या दुष्काळाची आठवण करून देणारा'; शेतकऱ्यांना मदत वाढविण्यासाठी पाठपुरावा करणार - रामदास आठवले

**जालना - प्रतिनिधी**

यंदा पावसातील दीर्घ खंड आणि अपेक्षेपेक्षा कमी पावसामुळे राज्यातील अनेक भागांत गंभीर दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. या संकटातून शेतकऱ्यांना बाहेर काढण्यासाठी शासनाने जाहीर केलेली मदत वाढविण्याची गरज असून, दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना अग्रीम स्वरूपात देण्यात येणारी पाच हजार रुपयांची रक्कम तुटपुंजी आहे. त्यामुळे या मदतीत वाढ करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा करणार असून, केंद्र सरकारकडूनही नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे केंद्रीय सामाजिक न्याय व अधिकारिता राज्यमंत्री रामदास आठवले यांनी सांगितले. 'सध्याचा दुष्काळ १९७२ च्या दुष्काळाची आठवण करून देणारा आहे. त्यावेळी मोठ्या प्रमाणावर स्थलांतराची परिस्थिती निर्माण झाली होती. यंदाही अनेक भागांत तशीच परिस्थिती निर्माण होण्याची भीती आहे,' असे नमूद करत आठवले यांनी दुष्काळाच्या गांभीर्याकडे लक्ष वेधले. केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी गुरुवारी (दि. १६ ऑक्टोबर) बदनापूर तालुक्यातील देवगाव-कुसळी परिसरातील शेतशिवारात जाऊन पीक परिस्थितीची पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून पावसाच्या अनियमिततेमुळे निर्माण झालेल्या अडचणी जाणून घेतल्या. त्यानंतर जालना शहरातील एका हॉटेलमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. या पत्रकार परिषदेला आमदार नारायण कुचे, महापौर वंदनाताई मगरे, भास्कर दानवे, ब्रह्मानंद चव्हाण, महेंद्र रत्नपारखे, दौलतराव खरात, मिलिंद शेळके आदी उपस्थित होते.

दुष्काळामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडण्याची शक्यता आहे. खरीप हंगामातील पिकांचे नुकसान, उत्पादनातील संभाव्य घट आणि शेतीवरील वाढता खर्च यामुळे शेतकऱ्यांसमोर मोठे आर्थिक संकट उभे राहिले आहे. अशा परिस्थितीत शासनाकडून मिळणारी मदत शेतकऱ्यांना दिलासा देणारी असणे आवश्यक आहे, असे आठवले यांनी स्पष्ट केले.

राज्य सरकारने दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना अग्रीम स्वरूपात पाच हजार रुपये देण्याचे जाहीर केले आहे. मात्र, सध्याच्या (पान २ वर)

# संपादकीय...

## एका दिवसाचा समाधानकारक भाव म्हणजे उद्योगाचे यश नव्हे

जालना कृषी उत्पन्न बाजार समितीतील रेशीम कोष बाजारपेठेत खांडवी (ता. परतूर) येथील मदन रंगनाथ बरकुले यांच्या रेशीम कोषाला प्रतिकिलो ८२० रुपये, तर गोविंद रंगनाथ बरकुले यांच्या उत्पादनाला ८१५ रुपये दर मिळाला. दिशा सिल्क, जालना यांनी केलेली ही खरेदी रेशीम उत्पादकांसाठी निश्चितच उत्साहवर्धक आहे. पारंपरिक शेतीतील वाढते खर्च, पावसाची अनिश्चितता आणि पिकांच्या बाजारभावातील चढ-उतार यामुळे त्रस्त असलेल्या शेतकऱ्यांसाठी पर्यायी उत्पन्नाचे मार्ग महत्त्वाचे ठरत आहेत. अशा परिस्थितीत रेशीम कोषाला मिळालेला हा दर आशा निर्माण करणारा आहे. मात्र, या घटनेकडे केवळ चांगला भाव मिळाल्याची आनंदवार्ता म्हणून पाहणे पुरेसे ठरणार नाही. जालन्यातील रेशीम शेती खरोखरच शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य देणारा व्यवसाय बनू शकते का, हा अधिक महत्त्वाचा प्रश्न आहे. याचे उत्तर एका व्यवहारातील दरात नसून, संपूर्ण रेशीम उत्पादन साखळीच्या कार्यक्षमतेत दडलेले आहे. रेशीम कोषाला प्रतिकिलो ८२० रुपये दर मिळणे ही सकारात्मक बाब असली, तरी या दराकडे स्वतंत्रपणे पाहून रेशीम शेती मोठ्या नफ्याचा व्यवसाय असल्याचा निष्कर्ष काढता येणार नाही. तुती लागवडीचा खर्च, जमीन व पाण्याची उपलब्धता, रेशीम अळीचे संगोपन, मजुरी, कीटकनियंत्रण, उपकरणे, वीज आणि इतर व्यवस्थापन खर्च यांचा विचार केल्यानंतरच प्रत्यक्ष नफा किती, हे स्पष्ट होईल. उत्पादनाचा दर्जा, कोषांचे वजन आणि गुणवत्ता, बाजारातील मागणी तसेच खरेदीदारांची स्पर्धा यांवरही मिळणारा भाव अवलंबून असतो. त्यामुळे एखाद्या दिवशी मिळालेला सर्वोच्च दर आणि वर्षभर शेतकऱ्याला मिळणारा सरासरी दर यांत फरक असू शकतो. म्हणूनच रेशीम उत्पादकांच्या उत्पन्नाचे मूल्यमापन करताना केवळ प्रतिकिलो भाव प्रसिद्ध करण्यापेक्षा एक एकर क्षेत्रातून मिळणारे उत्पादन, एकूण खर्च, विक्रीतून मिळणारे उत्पन्न आणि निव्वळ नफा यांची माहिती उपलब्ध होणे आवश्यक आहे. अशी आकडेवारी समोर आली, तर रेशीम शेतीकडे वळू इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांना निर्णय घेणे अधिक सोपे होईल. कृषी उत्पन्न बाजार समिती, जालना आणि जिल्हा रेशीम कार्यालय यांच्या समन्वयातून रेशीम उत्पादकांना स्थानिक बाजारपेठ उपलब्ध होणे ही महत्त्वाची बाब आहे. शेतकऱ्यांना उत्पादित माल विकण्यासाठी दूरवर जाण्याची गरज कमी होणे, खरेदीदारांशी संपर्क साधता येणे आणि बाजारभावाची माहिती मिळणे यामुळे विक्री प्रक्रिया सुलभ होऊ शकते. पण बाजारपेठेचे खरे यश केवळ काही व्यवहारांवर ठरत नाही. शेतकऱ्यांनी उत्पादित केलेला कोष नियमितपणे खरेदी केला जातो का? खरेदीदारांची संख्या पुरेशी आहे का? दर ठरविण्याची प्रक्रिया पारदर्शक आहे का? मालाचा दर्जा तपासण्याचे निकष सर्वांना स्पष्ट आहेत का? या प्रश्नांची उत्तरे महत्त्वाची आहेत. एकाच खरेदीदारावर अवलंबून राहण्याची वेळ उत्पादकांवर येऊ नये, यासाठी अधिक खरेदीदारांना बाजारपेठेशी जोडण्याची गरज आहे. नियमित लिलाव किंवा अन्य पारदर्शक खरेदी पद्धती, दरांची सार्वजनिक नोंद आणि व्यवहारांची स्पष्ट माहिती यामुळे शेतकऱ्यांचा बाजारव्यवस्थेवरील विश्वास वाढू शकतो. शेतकऱ्याला बाजारपेठेपर्यंत पोहोचविणे हे पहिले पाऊल; त्याच्या उत्पादनाला स्पर्धात्मक भाव आणि विक्रीची खात्री मिळवून देणे हे खरे उद्दिष्ट असले पाहिजे. पारंपरिक पिकांना पर्याय म्हणून रेशीम शेतीकडे पाहणे योग्य असले, तरी प्रत्येक शेतकऱ्यासाठी हा व्यवसाय सारख्याच प्रमाणात फायदेशीर ठरेल, असे गृहीत धरता येणार नाही. तुती लागवडीसाठी योग्य जमीन, पाण्याचे नियोजन, अळी संगोपनासाठी आवश्यक सुविधा, प्रशिक्षित मनुष्यबळ आणि तांत्रिक मार्गदर्शन यांची आवश्यकता असते. शेतकऱ्यांना केवळ उत्पादन वाढविण्याचा सल्ला देऊन चालणार नाही. रोगांचा प्रादुर्भाव, हवामानातील बदल, उत्पादनातील चढ-उतार आणि बाजारभाव घसरल्यास होणारे संभाव्य नुकसान यांसाठीही मार्गदर्शन आवश्यक आहे. नव्याने रेशीम शेती सुरू करणाऱ्यांना प्रात्यक्षिके, प्रशिक्षण आणि अनुभवी उत्पादकांचे मार्गदर्शन उपलब्ध झाले पाहिजे. तसेच रेशीम कोषांची गुणवत्ता सुधारण्यासाठी आणि उत्पादन खर्च कमी करण्यासाठी संशोधन व तंत्रज्ञानाचा उपयोग शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविणे गरजेचे आहे. शासकीय विभाग, बाजार समिती आणि खरेदीदार यांनी केवळ व्यवहारापुरते मर्यादित न राहता उत्पादनापासून विक्रीपर्यंतच्या संपूर्ण प्रक्रियेत सहकार्य करावे. जालना येथील रेशीम कोष बाजारपेठेला अधिक सक्षम करण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समिती आणि जिल्हा रेशीम कार्यालयाने काही बाबींवर प्राधान्याने काम करणे आवश्यक आहे. नियमित बाजारभावाची माहिती: दररोज किंवा प्रत्येक व्यवहारानंतर मिळालेला भाव, कोषांची गुणवत्ता आणि विक्रीचे प्रमाण यांची नोंद सार्वजनिक करावी. अधिक खरेदीदारांचा सहभाग: बाजारपेठेत स्पर्धा वाढविण्यासाठी रेशीम उद्योगातील इतर खरेदीदारांनाही सहभागी करून घ्यावे. खर्च आणि नफ्याचा अभ्यास: जिल्ह्यातील रेशीम उत्पादकांचा प्रत्यक्ष उत्पादन खर्च व निव्वळ उत्पन्न यांचे सर्वेक्षण करावे.तांत्रिक प्रशिक्षण: तुती लागवड, अळी संगोपन, रोगनियंत्रण आणि दर्जेदार कोष उत्पादनासाठी प्रशिक्षण उपलब्ध करावे. जोखीम व्यवस्थापन: उत्पादनातील नुकसान आणि बाजारभावातील घसरण यांमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान कमी करण्यासाठी उपलब्ध शासकीय योजना व सहाय्य यांची माहिती द्यावी. या उपाययोजना प्रभावीपणे राबविल्या गेल्यास रेशीम कोष बाजारपेठ ही केवळ विक्रीची जागा न राहता जिल्ह्यातील रेशीम उद्योगाच्या विकासाचे केंद्र बनू शकते. मदन बरकुले आणि गोविंद बरकुले यांच्या रेशीम कोषाला मिळालेला अनुक्रमे ८२० आणि ८१५ रुपये प्रतिकिलो दर हा रेशीम उत्पादकांसाठी आनंदाचा विषय आहे. या यशाचे स्वागत करतानाच, त्यातून इतर शेतकऱ्यांनाही प्रेरणा मिळेल आणि जालना जिल्ह्यात रेशीम शेतीचा विस्तार होईल, अशी अपेक्षा करता येईल. मात्र, शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीचा प्रश्न केवळ चांगल्या बाजारभावाने सुटणार नाही. उत्पादन खर्च नियंत्रणात ठेवणे, दर्जेदार उत्पादन, पारदर्शक व्यवहार, खरेदीदारांची उपलब्धता आणि बाजारभावातील स्थैर्य या सर्व घटकांची सांगड घालावी लागेल. आजचा ८२० रुपयांचा दर हा आनंदाचा क्षण आहे; उद्या तो शेतकऱ्याच्या खात्यात टिकाऊ नफा म्हणून उतरतो का, हेच रेशीम शेतीच्या यशाचे खरे मोजमाप ठरेल.

# दादांनो आता तरी झाडे लावा हो...

हल्ली मराठवाड्यासह संपूर्ण महाराष्ट्रात दुष्काळाचे सावट पसरले आहे. बरोबर जून महिन्यात मृग नक्षत्राला प्रारंभ झाला आणि हवामान खात्याने पावसाचा अंदाज चांगला वर्तवला की लगेच सर्व शेतकरी बांधव हवामान खात्याच्या भरवशावर थोडाफार पाऊस पडला की लागलीच पेरणी करून मोकळे होतात. परंतु हल्ली हवामान खात्याचे अंदाज फेल ठरत आहेत. हे आपल्याला माहीतच आहे. कधी कधी हवामान खात्याचा अंदाज खरा ठरतो. हे सुद्धा आपल्याला नाकारता येणार नाही. परंतु ज्या भागात वृक्षांची संख्या अधिक आहे, त्याच भागात पाऊस मुसळधार पडत आहे. आणि जिकडे झाडांची संख्या कमी आहे तिकडे मात्र पाऊसही कमी बरसत आहे. मागील दहा वर्षांपासून महाराष्ट्रात पाऊस म्हणावा तसा पडत नाही. शेतकऱ्यांच्या वाट्याला एकतर कोरडा दुष्काळ आहे नाहीतर ओला दुष्काळ आहे. पाऊस पडला की कितीही पडत आहे. आणि एकदा थांबला की पूर्ण पाऊस काळ होईपर्यंत बरसायचे नाव घेत नाही. मग काय? शेवटी शेतकऱ्यांच्या वाट्याला कोरडा दुष्काळ येणे सहाजिक आहे. पाऊस पडत नाही म्हणून शेतकरी पावसाला दोष देत आहेत. पण पाऊस कशामुळे पडत नाही, याचा विचार का बरे करत नाहीत? पाऊस न पडण्याला जबाबदार कोण आहे? तर आपण सर्वजण आहोत. कारण आपण वृक्ष लागवड करण्याऐवजी वृक्षतोड करून निसर्गाला भकास करून टाकले आहे. मोठ्या प्रमाणात वृक्षतोड करायची आणि त्या जागी मोठ मोठ्या बिल्डिंग, उद्योग धंदे आणि कारखाने उभे करायचे. त्यात आपलीही काही चुकी नाही. कारण लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे, लोकसंख्या वाढत असल्यामुळे लोकांना राहण्यासाठी जागा कमी पडत आहे. जागा व्हावी म्हणून वृक्षतोड आपण करत आहोत. पण याचा परिणाम थेट ऋतुचक्रावर होत आहे. म्हणून लोकसंख्या विकासात वाढ थांबवणे ही देखील काळाची गरज आहे. हम दो, हमारे दो ही पद्धत अस्तित्वात आणावी लागेल.तरच लोकसंख्या कमी होईल आणि वृक्षतोड कमी होईल. नाहीतर लोकसंख्या वाढत गेली आणि लोकांना राहण्यासाठी जागा कमी पडू लागली की लोक आपोआप वृक्षतोड करून त्या ठिकाणी घरे बांधतात आणि आपण सगळ्यांनी मिळून मोकळ्या जागेत, रस्त्याच्या कडेने, घराच्या समोर, शेतातील बांधावर वृक्ष लागवड करून पर्यावरणाला आणि निसर्गाला अबाधित ठेवणे काळाची गरज आहे. आपण जेवढे झाडे लावाल तेवढा अधिक पाऊस पडण्याची शक्यता असते. आपण पाहतोय की हल्ली ज्या भागात वृक्षांची संख्या कमी आहे त्या भागात पाऊस पडत नाही आणि ज्या भागात वृक्ष मोठ्या प्रमाणात आहेत तिथे मात्र पाऊस थांबायचे नाव घेत नाही. हल्ली मराठवाड्यावर कोरडा दुष्काळ पडण्याचे कारण म्हणजे वृक्षतोड आणि जल प्रदूषण कारणीभूत आहे.

यावर्षीचा दुष्काळ १९७२ च्या दुष्काळापेक्षा भयानक दुष्काळ म्हणून जाहीर केला आहे. मृग नक्षत्राला आरंभ होताच थोडाफार पाऊस पडला की शेतकरी शेतात पेरणी करतात. शेती देखील यावर्षी चांगली पिकणार होती परंतु निसर्गाच्या दुष्टचक्रात शेती अडकली. लोकांना देखील वाटू लागले की, आता यावर्षी चांगली सुगी होणार. परंतु शेतकऱ्यांच्या आशा पल्लवीत झाल्या आणि अचानक पावसाने बरसने थांबवले. आणि शेतकरी नैराश्याच्या कचाट्यात अडकले. पूर्ण पावसाळा संपून आता हिवाळ्याला आगमन होत आहे. तरी अजून देखील पाऊस पडायचा पत्ता नाही. विशेष करून शहरी भागापेक्षा ग्रामीण भागातील शेतकरी दुष्काळाच्या झळा सोसत आहेत. शेतातील विहिरीला पाणी नाही.

विहिरी, तलाव, नद्या आणि खदानी देखील कोरड्या पडायच्या मार्गावर आहेत. हातपंपाला आणि बोरला देखील पाणी आता कमी प्रमाणात येत आहे. दुष्काळामुळे संपूर्ण जनजीवन विस्कळीत झाले आहे. तळे विहिरी आणि नद्या कोरड्याठाक पडल्यामुळे पशु प्राण्यांचे जीवन धोक्यात आले आहे. लोकांना पाण्याच्या शोधात वनवन भटकावे लागणार आहे. जनावरांना चाऱ्याची नितांत गरज भासणार आहे. पाण्याअभावी व चाऱ्या अभावी माणसांचे आणि इतर प्राण्यांचे हाल हाल होणार आहेत. आता लोकांचा कल पुणे व मुंबई या ठिकाणी कामासाठी लोकांची गर्दी पडणार आहे. यावर्षी पाऊस पडला नाही आता पुढल्या वर्षी देखील पडेल का नाही? याचा भरवसा काय? कारण सांगायचा मूळ मुद्दा म्हणजे याला कारणीभूत आपणच आहोत परंतु आपण निसर्गाला दोष देत आहोत. यावर्षी शेतकऱ्यांची दिवाळी देखील गोड होणार नाही. कोणतेच सण-उत्सव थाटात साजरे केले जाणार नाहीत. दुष्काळाच्या झळा आणि नापिकीला कंटाळून शेतकरी आत्महत्या करत आहेत. शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. सावकाराचे कर्ज, घर संसार, मुला मुलींचे शिक्षण आणि इतर लागणारा खर्चा यामुळे शेतकरी कोलमडून गेला आहे. आतून पूर्णपणे खचून गेला आहे. भविष्याचा विचार करून शेतकरी निराश होत आहे आणि आत्महत्या करत आहे. त्यासाठी शेतकऱ्यांनी निसर्गाला व हवामान खात्याला दोष देत बसण्यापेक्षा आपल्या सतःला दोषी ठरवून मोठ्या प्रमाणात होणारी वृक्षतोड थांबवावी आणि मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करावी. त्यासाठी शेतकऱ्यांनी आता तरी जागृत होण्याची गरज आहे. वृक्षतोड करणाऱ्यांवर शासनाने कठोर कारवाई करावी. प्रत्येकाने दोन ते तीन झाडे दत्तक घेऊन त्या झाडांचे मोठ्या वृक्षात रूपांतर होईपर्यंत चांगले संगोपन करावे आणि भकास, उजाड व विद्रूप झालेला निसर्ग पुन्हा एकदा हिरव्या शालूने नेसवावा.

नाहीतर आपण निसर्गासोबत पंगा घेत असाल तर तो आपल्याला जिव्हारी लागणार आहे. निसर्गासोबत नाद करणे बरा नाही. आपण असेच वृक्षतोड करीत राहिलो आणि वृक्ष लावण्याचा उपक्रम हाती जर घेतला नसेल तर समजा एक दिवस आपल्याला उष्णतेच्या झळांनी भाजून निघावे लागेल. प्रशासनाने देखील याची गांभीर्याने दखल घेणे हल्ली गरजेचे आहे. शेतकरी जगाचा पोशिंदा आहे तो जगला तरच शेती पिकेल आणि देश जगेल. नाहीतर जगाला एक दिवस तडफडून मरावे लागणार आहे, एवढे मात्र निश्चित. म्हणून दादांनो जागृत होऊन आता तरी झाडे लावा हो...

**- बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

# पान १ वरुन...

### जालना बाजार...

निर्माण करण्यावर किती खर्च केला जातो, याची माहितीही सार्वजनिक व्हावी, अशी अपेक्षा या चर्चेतून व्यक्त झाली.

बाजार समितीवर सध्या प्रशासक असतानाही प्रत्यक्ष कारभार आमदार अर्जुन खोतकर पाहत असल्याचा आरोप गोरंट्याल यांनी केला. या आरोपाच्या पार्श्वभूमीवर बाजार समितीतील निर्णयप्रक्रिया, प्रशासकीय अधिकार, आर्थिक मंजुरी आणि विविध व्यवहारांमध्ये संबंधित पदाधिकाऱ्यांची भूमिका काय आहे, याबाबत स्पष्टता येणे आवश्यक आहे.

बाजार समितीच्या कारभारात प्रशासकीय नियमांचे पालन झाले का, जागावाटप व गाळेविक्रीचे निर्णय कोणत्या प्राधिकरणाने घेतले आणि त्यासाठी आवश्यक मंजुरी घेण्यात आली होती का, या मुद्द्यांची कागदपत्रांच्या आधारे पडताळणी होणे महत्त्वाचे ठरणार आहे. दरम्यान, बाजार समितीतील एक हजार कोटी रुपयांच्या कथित घोटाळ्याचा आरोप करताना गोरंट्याल यांनी विविध व्यवहारांवर आक्षेप नोंदवले आहेत. या आरोपांना पुष्टी देणारी कागदपत्रे, लेखापरीक्षण अहवाल किंवा अधिकृत चौकशीचे निष्कर्ष सार्वजनिकरीत्या उपलब्ध असल्याची माहिती या पत्रकार परिषदेत देण्यात आलेली नाही. त्यामुळे आरोपांची सत्यता तपासण्यासाठी स्वतंत्र चौकशी आणि आर्थिक नोंदींची पडताळणी आवश्यक आहे.

बाजार समितीच्या कथित अनियमिततेबरोबरच जालना खरेदी-विक्री संघ आणि जालना सहकारी साखर कारखान्याच्या कारभारावरही गोरंट्याल यांनी टीका केली. खरेदी-विक्री संघाची जागा एका मित्राच्या फायद्यासाठी ताब्यात घेतल्याचा, संघ बंद करून त्या ठिकाणी महाविद्यालय उभारल्याचा आणि विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी पैसे घेतले जात असल्याचा आरोप त्यांनी केला. या आरोपांबाबत स्वतंत्र कागदपत्रे किंवा संबंधित संस्थांची बाजू पत्रकार परिषदेत मांडण्यात आल्याची माहिती उपलब्ध नाही. रामनगर सहकारी साखर कारखान्याच्या प्रश्नावरही त्यांनी भूमिका स्पष्ट केली. आमदार अर्जुन खोतकर यांना शेतकऱ्यांचे खरेच भले करायचे असेल, तर त्यांनी रामनगर सहकारी साखर कारखाना सुरू करण्यासाठी पुढाकार घ्यावा. कारखाना सुरू झाल्यास आपण स्वतः त्यांचा सत्कार करू, असे आव्हान गोरंट्याल यांनी दिले. या आरोप-प्रत्यारोपांमुळे बाजार समितीच्या व्यवहारांसह सहकारी संस्थांच्या आर्थिक व प्रशासकीय कारभाराची चर्चा पुन्हा ऐरणीवर आली आहे. बाजार समितीतील कथित एक हजार कोटी रुपयांच्या घोटाळ्याचा मुद्दा आता आपण गांभीर्याने हाती घेतला असून, या प्रकरणात शासनाकडे तक्रार करण्यात येणार आहे. तक्रारीनंतरही संबंधित यंत्रणांनी कारवाई केली नाही, तर न्यायालयात दाद मागण्यात येईल, असे गोरंट्याल यांनी स्पष्ट केले.

या प्रकरणात केवळ राजकीय आरोप-प्रत्यारोप न होता बाजार समितीतील गाळेवाटप, जागांची विक्री, गूळ मार्केटमधील व्यवहार, कोल्ड स्टोरेजचे वाटप आणि बाजार समितीच्या उत्पन्न-खर्चाची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे. लेखापरीक्षण अहवाल, करारपत्रे, जागावाटपाचे आदेश आणि आर्थिक नोंदी तपासल्यास कथित गैरव्यवहारांबाबत वस्तुस्थिती समोर येऊ शकते. आता शासनाकडे तक्रार दाखल झाल्यानंतर कोणती चौकशी सुरू होते, बाजार समितीच्या आर्थिक व्यवहारांची तपासणी केली जाते का आणि संबंधित आरोपांबाबत अधिकृत यंत्रणा काय भूमिका घेते, याकडे जालना जिल्ह्यातील शेतकरी आणि नागरिकांचे लक्ष लागले आहे.

### जालन्यात कर्करोग...

रुग्णांना आणि त्यांच्या नातेवाइकांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.

मात्र, या सुविधा प्रत्यक्षात सुरू होण्याचा आणि रुग्णांना त्यांचा लाभ मिळण्याचा वेग संबंधित अंमलबजावणी, आवश्यक परवानग्या, उपलब्ध मनुष्यबळ आणि वैद्यकीय पायाभूत सुविधांवर अवलंबून राहणार आहे.

**औषधनिर्माणशास्त्र वगळता विविध वैद्यकीय शाखांना संधी**

शासनाच्या निर्णयानुसार, औषधनिर्माणशास्त्र अर्थात फार्मसी अभ्यासक्रम वगळता विविध वैद्यकीय सेवा आणि त्यांच्याशी संबंधित शैक्षणिक अभ्यासक्रम सुरू करता येतील. यामध्ये जनरल मेडिसीन, डायलिसिस, ऑर्थोपेडिक, ईएनटी, बालरोग, हृदयरोग, मेंदूविकार, रक्तविकार आणि कर्करोग उपचारांचा समावेश आहे. तसेच नर्सिंग कॉलेज, ऑप्टोमेट्री कॉलेज, ऑपरेशन थिएटर टेक्निशियन आणि अनेस्थेशिया असिस्टंट यांसारखे अभ्यासक्रम सुरू करण्याचीही मुभा देण्यात आली आहे. या निर्णयामुळे आरोग्यसेवेच्या विस्तारासोबतच वैद्यकीय क्षेत्रातील मनुष्यबळ तयार करण्यासाठी प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध होऊ शकतात.

तथापि, केवळ शैक्षणिक संस्था सुरू करणे किंवा स्वतंत्रपणे अभ्यासक्रम चालवणे हा या मंजुरीचा उद्देश असणार नाही. सुरू करण्यात येणारा प्रत्येक शैक्षणिक अभ्यासक्रम संस्थेमध्ये प्रत्यक्ष दिल्या जाणाऱ्या वैद्यकीय सेवांशी संबंधित असणे बंधनकारक राहणार आहे. कोणताही नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यापूर्वी तो रुग्णालयाच्या प्रत्यक्ष वैद्यकीय सेवेशी जोडलेला आहे किंवा नाही, याची खातरजमा जालना जिल्हाधिकाऱ्यांकडून करून घ्यावी लागणार आहे.

**परवडणाऱ्या दरात औषधे उपलब्ध करण्यावर भर**

या प्रकल्पाचा वापर सार्वजनिक हितासाठी आणि ना-नफा तत्त्वावर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. सर्वसामान्य रुग्णांना परवडणाऱ्या दरात औषधे, गोळ्या, इंजेक्शन्स आणि आवश्यक वैद्यकीय साहित्य उपलब्ध व्हावे, यासाठी शासनाच्या योजनेनुसार जनऔषधी केंद्र किंवा ना-नफा तत्त्वावर औषध विक्री केंद्र सुरू करण्याची मुभाही देण्यात आली आहे.

गंभीर आजारांवरील उपचारांमध्ये औषधांचा खर्च हा अनेक कुटुंबांसाठी मोठा आर्थिक प्रश्न ठरतो. अशा परिस्थितीत सवलतीच्या दरात औषधे उपलब्ध करून देणारी व्यवस्था उभी राहिल्यास रुग्णांच्या खर्चाचा भार कमी होण्यास मदत होऊ शकते. मात्र, यासाठी संबंधित केंद्राची स्थापना, औषधांची उपलब्धता आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी महत्त्वाची ठरणार आहे.

या प्रकल्पाच्या अंमलबजावणीवर जालना जिल्हाधिकारी तसेच छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त लक्ष ठेवणार आहेत. मंजुरी देताना शासनाने जमिनीच्या वापराबाबत स्पष्ट अटी घातल्या आहेत. या निर्णयामुळे मंजूर जमिनीचे क्षेत्रफळ वाढणार नाही, जमिनीची मालकी बदलणार नाही किंवा यापूर्वी लागू असलेल्या नियमांमध्ये कोणतीही सूट मिळणार नाही. मंजुरीच्या अटींचे उल्लंघन झाल्यास शासनाकडून योग्य ती कायदेशीर कारवाई केली जाऊ शकते. त्यामुळे या निर्णयाचा लाभ रुग्णांपर्यंत पोहोचवताना सार्वजनिक हित, परवडणारे उपचार आणि मंजूर उद्देशानुसार जमिनीचा वापर या बाबींना प्राधान्य द्यावे लागणार आहे. प्रशासनाच्या देखरेखीखाली प्रकल्पातील सुविधा प्रत्यक्ष सुरू झाल्यानंतरच जालना आणि मराठवाड्यातील रुग्णांना त्याचा पूर्ण लाभ मिळू शकेल. या निर्णयाबाबत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आरोग्यसेवेचे महत्त्व अधोरेखित केले. ते म्हणाले, ''आरोग्य हीच खरी ईश्वरसेवा आहे. कर्करोग, हृदयविकार यांसारख्या गंभीर आजारांवरील उपचारांसाठी गोरगरिबांना पैशांअभावी किंवा दूरवर भटकंती करावी लागणे अत्यंत वेदनादायी असते. जालन्यातील या प्रकल्पामुळे सर्वसामान्य जनतेला त्यांच्याच भागात अत्यंत माफक आणि परवडणाऱ्या दरात अत्याधुनिक वैद्यकीय सेवा मिळतील. राज्य सरकारच्या या निर्णयामुळे जालन्यातील आरोग्यसेवेच्या विस्ताराला चालना मिळण्याची अपेक्षा आहे. उपचार सुविधा, वैद्यकीय प्रशिक्षण आणि परवडणाऱ्या औषधांची उपलब्धता या तिन्ही बाबी प्रभावीपणे राबविल्या गेल्यास या प्रकल्पाचा लाभ जालना जिल्ह्यासह मराठवाड्यातील गरजू रुग्णांना होऊ शकतो.

### सेवा संकल्प...

सिद्धिविनायक मुळे, जिल्हा सरचिटणीस सुनील पवार, शिवप्रकाश चितळकर, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष गोविंद भताने, नगरसेवक अक्षय गोरंटयाल, विजय कामड, नगरसेवक कल्याण भदनेकर, स्नेहलता कामड, तालुकाध्यक्ष संजय डोंगरे, संतोष खंडेलवाल, विष्णू डोंगरे, राहुल यादव उमेश पेंढारकर, चेतन देसरडा, संदीप नाईकवाडे, आकाश देशमाने, भगवान नागवे आदींची उपस्थिती होती. तसेच शाळेचे मुख्याध्यापक मोहम्मद अनीस अन्सारी, कुरेशी मॅडम यांच्यासह भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते, शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

यावेळी भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणासोबतच कला, संस्कार आणि सर्जनशीलतेला महत्त्व देणे आवश्यक आहे. प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये काही ना काही विशेष गुण दडलेले असतात. अशा गुणांना योग्य व्यासपीठ आणि प्रोत्साहन मिळाल्यास विद्यार्थी आत्मविश्वासाने आपली प्रगती साधू शकतात. सेवा, समर्पण आणि समाजाप्रती उत्तरदायित्व या भावनेतून राबविण्यात येणारे सेवा संकल्प अभियान हे केवळ सेवाभावी उपक्रमांपुरते मर्यादित नसून समाजातील विविध घटकांपर्यंत मदत आणि सकारात्मक विचार पोहोचविण्याचे माध्यम आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या वाढदिवसानिमित्त राबविण्यात येणाऱ्या या अभियानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे, त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविणे आणि शिक्षणाविषयी सकारात्मक वातावरण निर्माण करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे असेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे आयोजक तथा नवीन जालना मंडळ अध्यक्ष सुनील भैय्या खरे यांनी या उपक्रमाच्या आयोजनासाठी पुढाकार घेतला. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे आणि त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण व्हावा, या उद्देशाने सेवा संकल्प अभियानांतर्गत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

### 'हा दुष्काळ १९७२...

दुष्काळी परिस्थितीचा विचार करता ही रक्कम पुरेशी नसल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. शेतकऱ्यांच्या गरजा आणि झालेल्या नुकसानीचा विचार करून या मदतीत वाढ करावी, अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

केवळ राज्य सरकारच्या मदतीवर अवलंबून न राहता केंद्र सरकारकडूनही नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य मिळावे, यासाठी प्रयत्न केले जातील, असेही आठवले यांनी नमूद केले.

दुष्काळामुळे झालेल्या नुकसानीचे वस्तुनिष्ठ चित्र समोर येण्यासाठी पीक नुकसानीचे पंचनामे महत्त्वाचे आहेत. सध्या पंचनामे करण्याचे काम सुरू असून, जालना जिल्ह्यात जवळपास ८० टक्के पंचनामे पूर्ण झाल्याचे आठवले यांनी सांगितले.

पंचनाम्यांच्या आधारे नुकसानग्रस्त क्षेत्राची स्थिती स्पष्ट होईल. त्यानुसार शेतकऱ्यांना मदत मिळण्याचा मार्ग सुकर होऊ शकतो. त्यामुळे उर्वरित पंचनामेही वेळेत पूर्ण होणे आणि पात्र शेतकऱ्यांपर्यंत मदत पोहोचणे आवश्यक आहे. दरम्यान, पंचनाम्यांचे काम पूर्ण झाल्यानंतर प्रत्यक्ष मदतीचे वितरण किती वेगाने होते आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना किती आर्थिक सहाय्य मिळते, यावर या प्रक्रियेची परिणामकारकता अवलंबून राहणार आहे. दरवर्षी पावसाच्या अनिश्चिततेमुळे निर्माण होणाऱ्या संकटावर केवळ तात्पुरत्या मदतीच्या माध्यमातून मात करता येणार नाही.

दुष्काळाचा सामना करण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची गरज असल्याचे आठवले यांनी स्पष्ट केले.

'शेतकरी आहेत म्हणून आपण आहोत. शेतकरी मजबूत झाला, तर देश मजबूत होईल,' असे सांगत त्यांनी शेती आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थैर्याचे महत्त्व अधोरेखित केले.

पाण्याचे योग्य नियोजन, जलसाठ्यांची निर्मिती आणि उपलब्ध जलसंपत्तीचा समतोल वापर यावर भर देणे आवश्यक आहे. ज्या भागांतील नद्यांमध्ये मुबलक पाणी उपलब्ध आहे, तेथील पाणी पाणीटंचाई असलेल्या भागांकडे वळविण्याच्या दृष्टीने नदीजोड प्रकल्पांवर मोठ्या प्रमाणात काम होणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीही नदीजोड प्रकल्पाची संकल्पना मांडली होती. या विचाराच्या अनुषंगाने जलसंपत्तीचे नियोजन करून धरणे आणि अन्य जलसंधारणाच्या उपाययोजनांना गती देण्याची आवश्यकता असल्याचे आठवले म्हणाले.

दुष्काळाचा सामना करण्यासाठी शेतकऱ्यांची आर्थिक क्षमता कमी होत चालली आहे.

### पालकमंत्री पंकजाताई....

त्यांनी सांगितले. आचारसंहितेनंतर याठिकाणी आपण भेट देणार असल्याचे त्या म्हणाल्या. दुष्काळग्रस्तांना मदत करताना सीएसआर च्या बरोबरीने गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठान देखील पुढे राहील असे त्या म्हणाल्या.

**जलसंवर्धनाची कामे हाती घ्या**

शेतकरी व ग्रामीण मजुरांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी व्हीबी-जी रामजी योजनेंतर्गत रोजगारनिर्मितीची कामे प्रभावीपणे राबवावीत. जलसंधारण, नदी-नाल्यांचे खोलीकरण, गाळ काढणे, जलस्रोतांचे पुनर्भरण आणि विहिरींची दुरुस्ती यांसारख्या कामांना प्राधान्य देऊन शेतकऱ्यांना स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध करून द्यावा. यामुळे दुष्काळग्रस्त कुटुंबांना आर्थिक आधार मिळण्यासोबतच भविष्यातील पाणीटंचाईवर मात करण्यास मदत होईल. पाणीटंचाईग्रस्त गावांमध्ये रिचार्ज शाफ्ट, बंधारे व नाला खोलीकरणासाठी निधी उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात येणार असून, भविष्यातील दुष्काळाचा सामना करण्यासाठी आतापासूनच उपाययोजना करण्यावर बैठकीत भर देण्यात आला.

**टँकरद्वारे पाणीपुरवठ्याचा आढावा**

यावेळी पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी पीक पंचनामे, जिल्ह्यातील प्रकल्पातील पाणीसाठा, टँकरद्वारे पाणीपुरवठा, चारा उपलब्धता, रोजगार हमी योजना आणि शहरी व ग्रामीण भागातील पाणीपुरवठ्याचा आढावा घेतला.

# केंद्रीय समितीच्या दौऱ्यानंतर प्रशासन आणखी सक्रिय



मराठवाड्यातील आठही जिल्ह्यामध्ये व सर्व तालुक्यांमध्ये दुष्काळ सदृश्य परिस्थितीत केंद्र व राज्य शासनाच्या सनियंत्रणात वेगवेगळ्या उपाययोजना सुरू आहे.केंद्रीय पथकांच्या काही सूचनांना लक्षात घेऊन राज्य शासनाच्या नव्या सूचनेनुसार विभागीय स्तरावर महसूल प्रशासनाने संपूर्ण मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांत दुष्काळ निवारणासाठी सूक्ष्म नियोजन; पाणी, चारा आणि ग्रामीण रोजगारावर भर देणे सुरू केले आहे.मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन विभागातील आठही जिल्ह्यांमध्ये महसूल प्रशासनाने उपाययोजनांच्या नियोजनाला गती दिली आहे. विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकाऱ्यांच्या नेतृत्वात दुष्काळी परिस्थितीचा दररोज आढावा घेण्यात येत असून, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, पशुधनासाठी चारा, पीक नुकसानीची नोंद आणि ग्रामीण भागातील रोजगारनिर्मिती यांसारख्या महत्त्वाच्या बाबींवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

८ ते १० ऑक्टोबर २०२६ दरम्यान केंद्रीय आंतरमंत्रालयीन पथकाने मराठवाड्यातील विविध भागांची प्रत्यक्ष पाहणी केल्यानंतर दुष्काळाच्या परिणामांचे मूल्यांकन आणि आवश्यक उपाययोजनांच्या अंमलबजावणीसाठी प्रशासकीय स्तरावर अधिक समन्वयाने काम सुरू आहे.

**आठही जिल्ह्यांत परिस्थितीवर लक्ष**

छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी आणि हिंगोली या आठही जिल्ह्यांमध्ये स्थानिक परिस्थितीनुसार दुष्काळ व्यवस्थापनाचे नियोजन केले जात आहे. जिल्हाधिकारी आणि संबंधित विभागांच्या यंत्रणांमार्फत पर्जन्यमानातील तूट, पिकांची स्थिती, भूजल पातळी, धरणांमधील पाणीसाठा, टँकरद्वारे पाणीपुरवठ्याची गरज आणि चाऱ्याची उपलब्धता यांचा आढावा घेतला जात आहे. तालुका व गावनिहाय परिस्थिती लक्षात घेऊन संभाव्य अडचणींचा अंदाज घेणे आणि त्यानुसार आवश्यक उपाययोजनांची पूर्वतयारी करणे, याला प्राधान्य देण्यात येत आहे.

केंद्रीय पथकाच्या दौऱ्यात पिकांची प्रत्यक्ष स्थिती, पावसातील खंडामुळे झालेले नुकसान, जलस्रोतांची उपलब्धता आणि ग्रामीण भागातील परिस्थितीची पाहणी करण्यात आली. या पाहणीतून उपलब्ध झालेली माहिती तसेच जिल्हा प्रशासनाकडील नोंदी यांच्या आधारे दुष्काळी परिस्थितीचे मूल्यांकन करण्याची प्रक्रिया महत्त्वाची ठरणार आहे.तशी ती गतिशील ही झाली आहे. पीक कापणी प्रयोग वेळेत पूर्ण करणे, नुकसानीच्या नोंदी अचूक ठेवणे आणि पात्र शेतकऱ्यांना लागू निकषांनुसार मदत मिळण्यासाठी आवश्यक कार्यवाही करणे, यावर प्रशासनाचा भर आहे.

**पिण्याच्या पाण्याचे सूक्ष्म नियोजन**

दुष्काळामध्ये सर्वात महत्त्वाचे ठरते ते पिण्याचे पाणी.घरगुती वापराचे पाणी जनावरांना लागणारे पाणी आणि पुढील उन्हाळ्यापर्यंतची नियोजन याकडे प्रशासन लक्ष ठेवून आहे.पुढील काळात पाण्याचे दुर्भिक्ष वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन पिण्याच्या पाण्याचे नियोजन हा प्रशासनाच्या प्राधान्याचा विषय आहे. ज्या गावांमध्ये भूजल पातळी खालावली आहे किंवा नियमित पाणीपुरवठ्यात अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे, अशा ठिकाणच्या परिस्थितीवर लक्ष ठेवले जात आहे. टँकरद्वारे पाणीपुरवठा, आवश्यकतेनुसार विहिरी अधिग्रहित करणे, उपलब्ध जलस्रोतांचा योग्य वापर आणि पर्यायी पाणीपुरवठ्याची व्यवस्था यांसाठी स्थानिक गरजांनुसार नियोजन करण्यात येत आहे.

धरणे, तलाव, पाझर तलाव आणि अन्य जलस्रोतांमधील उपलब्ध पाणीसाठ्याचा विचार करून पिण्याच्या पाण्याच्या वापराचे नियोजन आवश्यक आहे. पाणीटंचाईची तीव्रता वाढण्यापूर्वी संभाव्य टंचाईग्रस्त गावांची ओळख पटविणे, उपलब्ध साधनसामग्रीचा आढावा घेणे आणि गरज भासल्यास तातडीने उपाययोजना करता याव्यात, यासाठी संबंधित यंत्रणांमध्ये समन्वय ठेवला जात आहे. त्याचबरोबर पावसाचे पाणी अडविणे, भूजल पुनर्भरण, जलस्रोतांचे पुनरुज्जीवन आणि जलसंधारणाच्या कामांनाही महत्त्व आहे.

**पशुधनासाठी चारा उपलब्धतेवर भर**

दुष्काळाचा परिणाम केवळ शेतीपुरता मर्यादित राहत नाही. पशुधनाचे संगोपन करणाऱ्या शेतकरी कुटुंबांनाही चारा आणि पाण्याच्या उपलब्धतेसंदर्भात अडचणींचा सामना करावा लागू शकतो. त्यामुळे आठही जिल्ह्यांमध्ये चाऱ्याची सद्यस्थिती, उपलब्ध साठा आणि आगामी काळातील गरज यांचा आढावा घेणे महत्त्वाचे ठरत आहे.

संभाव्य चारा टंचाई लक्षात घेऊन चारा उपलब्धतेचे नियोजन, चारा उत्पादनासाठी आवश्यक उपाययोजना आणि पशुधनासाठी पाण्याची उपलब्धता यांचा एकत्रित विचार केला जात आहे. स्थानिक परिस्थितीनुसार चारा उत्पादनाला चालना देणे, उपलब्ध संसाधनांचा योग्य वापर करणे आणि टंचाईग्रस्त भागांतील गरजा वेळेत ओळखणे यावर संबंधित यंत्रणांचे लक्ष आहे. यामुळे शेतकरी कुटुंबांवरील आर्थिक ताण कमी करण्यासाठी आवश्यक उपाययोजना आखता येतील.

**ग्रामीण रोजगारातून दुष्काळाचा सामना**

दुष्काळी परिस्थितीत शेतीतील उत्पन्न घटण्याची शक्यता असल्याने ग्रामीण कुटुंबांना रोजगार उपलब्ध करून देणे महत्त्वाचे आहे. रोजगार हमी योजनेंतर्गत जलसंधारण, मृदसंधारण, पाणी साठवण आणि अन्य मंजूर कामांचे नियोजन करून ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्यावर भर दिला जात आहे. स्थानिक गरजांनुसार कामांची निवड करताना रोजगारनिर्मितीबरोबरच भविष्यातील पाणी उपलब्धतेसाठी उपयुक्त ठरणाऱ्या कामांना प्राधान्य देणे आवश्यक आहे.

गावपातळीवरील पाणीटंचाई, शेतीची परिस्थिती आणि मजुरांची रोजगाराची गरज यांचा विचार करून कामांचे नियोजन करणे, हे प्रशासनासमोरील महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. जलसंधारणाची कामे पूर्ण झाल्यास पावसाचे पाणी साठविणे, जमिनीतील ओलावा टिकविणे आणि भूजल पुनर्भरणास मदत होऊ शकते. त्यामुळे तातडीच्या रोजगाराच्या गरजेला प्रतिसाद देतानाच दीर्घकालीन जलव्यवस्थापनासाठीही प्रयत्न केले जात आहेत.

**समन्वयातून उपाययोजनांची अंमलबजावणी**

दुष्काळ व्यवस्थापनासाठी महसूल, कृषी, जलसंपदा, भूजल सर्वेक्षण, पशुसंवर्धन आणि ग्रामीण विकास विभागांमधील समन्वय महत्त्वाचा आहे. विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हानिहाय परिस्थितीचा आढावा घेऊन स्थानिक गरजांनुसार उपाययोजनांचे नियोजन केले जात आहे. पाणी, चारा आणि रोजगार या तीन प्रमुख बाबींसोबतच पीक नुकसानीची अचूक नोंद, पीक विम्याशी संबंधित कार्यवाही आणि पात्र शेतकऱ्यांना नियमानुसार मदत मिळण्यासाठी आवश्यक प्रक्रिया यांवरही लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी तातडीच्या उपाययोजना आणि दीर्घकालीन नियोजन या दोन्हींची आवश्यकता आहे. केंद्रीय आंतरमंत्रालयीन पथकाच्या पाहणीनंतर परिस्थितीचे मूल्यांकन, उपलब्ध माहितीची पडताळणी आणि आवश्यक कार्यवाही यांना गती मिळाली आहे. आगामी काळातील संभाव्य पाणी व चारा टंचाईचा विचार करून आठही जिल्ह्यांमध्ये प्रशासनाकडून सुरू असलेले सूक्ष्म नियोजन, विभागीय समन्वय आणि गावपातळीवरील गरजांवर लक्ष केंद्रित करणाऱ्या उपाययोजना दुष्काळाचे परिणाम कमी करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहेत.

**सुरेश पाटील**
**सहाय्यक संचालक (माहिती )**
**विभागीय माहिती कार्यालय, छत्रपती संभाजीनगर**

# आभाळचं फाटलयं ठिगळ कुठे कुठे लावणार?

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांना सक्तीच्या रजेवर पाठवले कारण परिक्षांचे पेपर फुटी.सरकार मधील मंत्री, आमदार यांनी आपल्या खात्याच्या - विभागाच्या कार्यालयातील अधिकारी - कर्मचारी मंत्रालयात किंवा विभागीय कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना - अभ्यांगतांना शासकीय सेवेतील अधिकारी व कर्मचारी चांगली सेवा देतात की नाही हे पाहणे महत्त्वाचे आहे.प्रशासनावर लोकप्रतिनिधींचा धाक असेल तेव्हा अधिकारी व कर्मचारी कामा निमित्त येणाऱ्या नागरिकांना चांगले सहकार्य करतील.मूळात शासकीय सेवेतील पदे आता, खाजगी उत्पन्न मिळवून देणारी पदे झाली आहेत.यालाच भ्रष्टाचार म्हणतात ना? विवेक भीमनवार यांना रजेवर पाठवून लोकसेवा आयोगाच्या भ्रष्ट कारभाराच्या चौकशी समितीच्या सचिव पदावर तुकाराम मुंढे यांची नियुक्ती केली आहे.तुकाराम मुंडे कर्तव्य तत्पर आय ए एस अधिकारी म्हणून अन्न व औषध प्रशासन आयुक्त पदावर कार्यरत झाल्यापासून त्यांनी गैरकृत्य करणार्यांना चांगली अद्दल घडवली आहे.मुंढें सारखा अधिकारी जनतेच्या कल्याणाचा विचार करतो.तर ज्ञानेश कुमार, विवेक भीमनवार सारखे अधिकारी नियम व नियमावली, कायदे यांची पायमल्ली करून कोणाची तरी भलामण करतात हे आता स्पष्ट झाले आहे.परिक्षांचे पेपर फोडून अन्य परिक्षांर्थीवर अन्याय करणे हे भ्रष्ट कारभाराची पावती आहे.मुख्यमंत्री सरकारचे प्रमुख आहेत.उच्च विद्याविभूषित आहेत त्यांनीच ठरवावे विद्यार्थ्यांना मारायचे की तारायचे.तुकाराम मुंढे यांची कार्यपद्धती वाखाणण्याजोगी आहे ते लोकसेवा आयोगाच्या चौकशी समितीच्या सचिव पदाला न्याय मिळवून देतीलही पण, भ्रष्टाचार एवढा वाढला आहे त्यावर किती नियंत्रण मिळवतील ,आभाळचं फाटलं आहे ठिगळ कुठे कुठे लावणार म्हणून सरकारनेच भ्रष्टाचाराचे निर्मूलन करण्यासाठी तुकाराम मुंढे कडे जबाबदारी द्यावी.सरकारने भ्रष्टाचार रोखणे शक्य आहे.इच्छा शक्ती हवी.

**महादेव गोळवसकर**
**मुंबई,**
**९८६९४७६२०९**

# डॉ. प्रतापसिंह वेदप्रकाश पाटील यांना पसंती क्रमांक एकचे मत द्या!

## डॉ. निसार अहमद देशमुख यांचे आवाहन; विद्यमान आमदार सतीश चव्हाण यांच्या कामगिरीवर टीका

**जालना | प्रतिनिधी**

मराठवाडा पदवीधर मतदारसंघातील महाविकास आघाडीचे तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे अधिकृत उमेदवार डॉ. प्रतापसिंह वेदप्रकाश पाटील यांना पसंती क्रमांक एकचे मत देऊन प्रचंड मतांनी विजयी करावे, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सरचिटणीस डॉ. निसार अहमद देशमुख यांनी केले आहे. पदवीधरांचे प्रश्न सोडविणे, त्यांना न्याय मिळवून देणे आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी डॉ. पाटील सातत्याने कार्यरत असल्याचे त्यांनी सांगितले.

मराठवाडा पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बोलताना डॉ. देशमुख यांनी विद्यमान आमदार सतीश चव्हाण यांच्या कामगिरीवर टीका केली. चव्हाण यांना यापूर्वी तीन वेळा निवडून आणण्यासाठी आपण आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी मोठे प्रयत्न केले. तत्कालीन मंत्री राजेश भैय्या टोपे यांनीही त्यांच्या विजयासाठी प्रयत्न केले. मात्र, तीन वेळा संधी मिळूनही मराठवाड्यातील पदवीधरांच्या अपेक्षेनुसार विकासकामे झाली नसल्याचा आरोप डॉ. देशमुख यांनी केला. सतीश चव्हाण यांच्यासाठी यापूर्वी जागोजागी सभा घेणे, प्रचार करणे आणि मतदारांना त्यांच्या बाजूने मतदान करण्याचे आवाहन करणे, यासाठी आम्ही पुढाकार घेतला होता. मात्र, आता चौथ्यांदा आमदार होण्याची इच्छा व्यक्त करणाऱ्या चव्हाण यांना पदवीधर मतदार पुन्हा संधी देणार नाहीत, असा विश्वास डॉ. देशमुख यांनी व्यक्त केला. विकासकामांच्या अभावामुळे मतदारांमध्ये नाराजी असल्याचा दावाही त्यांनी केला.



डॉ. देशमुख पुढे म्हणाले की, पदवीधर मतदारसंघ हा केवळ निवडणुकीपुरता मर्यादित नसून उच्चशिक्षित तरुणांचे प्रश्न, बेरोजगारी, रोजगाराच्या संधी, पदवीधरांना न्याय आणि त्यांच्या भविष्यासाठी प्रभावी प्रतिनिधित्व मिळवून देण्याची महत्त्वाची जबाबदारी या मतदारसंघाच्या प्रतिनिधीवर असते. त्यामुळे मतदारांनी उमेदवाराची भूमिका, कार्य आणि पदवीधरांच्या प्रश्नांप्रती असलेली बांधिलकी लक्षात घेऊन मतदान करावे.

मराठवाड्यातील पदवीधरांचा आवाज अधिक बळकट करण्यासाठी आणि त्यांच्या सुरक्षित भविष्यासाठी डॉ. प्रतापसिंह वेदप्रकाश पाटील यांना पसंती क्रमांक एकचे मत द्यावे, असे आवाहन डॉ. निसार अहमद देशमुख यांनी केले.

पदवीधरांच्या प्रश्नांना प्राधान्य देणारे नेतृत्व निवडून देण्याची ही संधी असल्याचेही त्यांनी नमूद केले.

दरम्यान, शुक्रवार, दिनांक २३ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत आपल्या मतदान केंद्रावर जाऊन मतदान करावे, असे आवाहनही डॉ. देशमुख यांनी केले आहे.

# चंदनझिरा येथे सावित्रीमाई फुले अभ्यासिका उभारावी; संतोष जमधडे यांची मागणी

## प्रभाग क्रमांक १२ मधील जिजाऊ सृष्टीच्या खुल्या जागेत अभ्यासिका उभारण्यासाठी मंत्री अतुल सावे यांना निवेदन

**जालना | प्रतिनिधी**

जालना महानगरपालिका क्षेत्रातील चंदनझिरा परिसरातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करण्यासाठी तसेच उच्च शिक्षणाची तयारी करण्यासाठी पुरेशा सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी प्रभाग क्रमांक १२ मधील जिजाऊ सृष्टी येथील खुल्या जागेत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या नावाने अभ्यासिका उभारण्यात यावी, अशी मागणी माळी महासंघाच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात इतर मागास बहुजन कल्याण व दिव्यांग कल्याण विभागाचे मंत्री अतुल सावे यांना निवेदन सादर करून अभ्यासिकेच्या उभारणीसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याची विनंती करण्यात आली आहे.

माळी महासंघाचे विश्वस्त तथा राष्ट्रीय सचिव संतोष विष्णुराव जमधडे आणि क्रांतीसूर्य महात्मा फुले प्रतिष्ठानचे लक्ष्मण सर्जेराव घनवट यांच्या वतीने हे निवेदन देण्यात आले. चंदनझिरा परिसरात बहुजन समाजातील वंचित, उपेक्षित, आर्थिकदृष्ट्या दुर्बल तसेच कष्टकरी आणि कामगार कुटुंबांतील अनेक विद्यार्थी-विद्यार्थिनी वास्तव्यास आहेत. या विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची जिद्द असली, तरी स्पर्धा परीक्षांची तयारी करण्यासाठी शांत वातावरण, संदर्भग्रंथ, अभ्यासाचे साहित्य आणि अन्य शैक्षणिक सुविधा सहज उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी स्वतंत्र व सुसज्ज जागा उपलब्ध करून देण्याची आवश्यकता असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

प्रभाग क्रमांक १२ मधील जिजाऊ सृष्टी येथील खुल्या जागेत प्रस्तावित अभ्यासिका उभारल्यास परिसरातील विद्यार्थ्यांना मोठा लाभ होऊ शकतो. या अभ्यासिकेत प्रशस्त व शांत अभ्यास कक्ष, स्पर्धा परीक्षांसाठी आवश्यक पुस्तके, संदर्भग्रंथ, वर्तमानपत्रे, मार्गदर्शनपर साहित्य आणि इंटरनेट सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.

अभ्यासिकेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना एमपीएससी, यूपीएससीसह विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करण्यासाठी पोषक वातावरण मिळू शकते. तसेच उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना नियमित अभ्यासासाठी स्वतंत्र जागा उपलब्ध होऊन त्यांच्या शैक्षणिक प्रगतीला चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

**सावित्रीबाई फुले यांच्या विचारांना कृतीतून अभिवादन**

महात्मा ज्योतिराव फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाच्या माध्यमातून वंचित घटकांच्या उन्नतीसाठी आयुष्यभर संघर्ष केला. त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेत आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांतील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे आणि त्यांना प्रगतीच्या संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. विशेषतः विद्यार्थिनींना सुरक्षित व अभ्यासपूरक वातावरण मिळाल्यास त्यांच्या शिक्षणाला आणि स्वावलंबनाला प्रोत्साहन मिळू शकते, असे निवेदनात म्हटले आहे.

**निधी मंजूर करण्याची मागणी**

इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या संबंधित योजनेंतर्गत अथवा उपलब्ध निधीच्या तरतुदींमधून या अभ्यासिकेच्या उभारणीसाठी निधी मंजूर करावा. तसेच संबंधित अधिकाऱ्यांमार्फत प्रस्तावित जागेची पाहणी करून आवश्यक प्रशासकीय कार्यवाही करावी, अशी मागणी संतोष जमधडे आणि लक्ष्मण घनवट यांनी निवेदनाद्वारे केली आहे. चंदनझिरा परिसरातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने या प्रस्तावाचा सकारात्मक विचार करून शासनाने निधी उपलब्ध करून द्यावा, अशी अपेक्षा माळी महासंघाच्या वतीने व्यक्त करण्यात आली आहे. आता या मागणीवर शासन आणि संबंधित विभागाकडून कोणती कार्यवाही होते, याकडे परिसरातील विद्यार्थी व नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्याकडून देवगाव शिवारातील पीक परिस्थितीची पाहणी

## शेतकऱ्यांशी संवाद साधून जाणून घेतल्या अडचणी; नैसर्गिक संकटातून बाहेर काढण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याची ग्वाही



**जालना | प्रतिनिधी**

यंदा अपेक्षेपेक्षा कमी पाऊस आणि पावसातील प्रदीर्घ खंडामुळे राज्यातील अनेक भागांत दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर केंद्रीय सामाजिक न्याय व अधिकारिता राज्यमंत्री रामदास आठवले यांनी गुरुवारी (दि. १६ ऑक्टोबर) बदनापूर तालुक्यातील देवगाव कुसळी येथील शिवारात जाऊन पीक परिस्थितीची पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधत पावसाच्या अनियमिततेमुळे शेतीसमोर उभ्या राहिलेल्या अडचणी जाणून घेतल्या.

यंदाच्या हंगामात पावसाने दिलेल्या ओढीमुळे खरीप पिकांच्या वाढीवर परिणाम होण्याची चिंता शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे. पावसातील दीर्घ खंडामुळे पिकांना आवश्यक ओलावा मिळण्यात अडचणी निर्माण झाल्या असून, त्याचा उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना दिलासा मिळावा आणि त्यांच्या नुकसानीची वस्तुस्थिती समोर यावी, या दृष्टीने पीक परिस्थितीची पाहणी महत्त्वाची ठरते. केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी देवगाव शिवारातील पिकांची पाहणी करताना शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष चर्चा केली. शेतीतील परिस्थिती आणि शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या अडचणी समजून घेतल्या. शेतकरी बांधवांना या नैसर्गिक संकटातून बाहेर काढण्यासाठी आणि त्यांना मदत करण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

या पाहणीदरम्यान कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांचीही उपस्थिती होती. बदनापूर उपविभागीय कृषी अधिकारी कुमारी बागुल, तहसीलदार नंदेश्वर, मंडळ कृषी अधिकारी कोरडे आणि कृषी अधिकारी गुरुजी यांच्यासह देवगावचे सरपंच व स्थानिक शेतकरी उपस्थित होते.

पावसाच्या अनियमिततेमुळे निर्माण झालेल्या कृषी संकटाच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय राज्यमंत्र्यांच्या या पाहणीमुळे देवगाव परिसरातील पीक परिस्थिती आणि शेतकऱ्यांच्या समस्यांकडे लक्ष वेधले गेले आहे.

आता प्रत्यक्ष परिस्थितीच्या आढाव्यानंतर शेतकऱ्यांना कोणत्या स्वरूपात मदत मिळते, याकडे परिसरातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

# नाफेडच्या शेतमाल विक्रीतील निव्वळ नफा दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना द्या!

## मागील वर्षीच्या खरेदीदर आणि सध्याच्या विक्रीदरातील फरक बोनस म्हणून देण्याची आमदार अर्जुन खोतकर यांची मागणी

**जालना - प्रतिनिधी**

दुष्काळामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी नाफेडने मागील हंगामात खरेदी केलेल्या शेतमालाच्या विक्रीतून मिळणाऱ्या वाढीव निव्वळ रकमेचा लाभ शेतकऱ्यांना देण्यात यावा, अशी मागणी आमदार अर्जुनराव खोतकर यांनी केली आहे. मागील वर्षी नाफेडने ज्या दराने शेतमाल खरेदी केला, त्या तुलनेत सध्या त्याच मालाला अधिक भाव मिळत असल्यास खरेदी किंमत आणि आवश्यक खर्च वजा करून उरणारी संपूर्ण निव्वळ वाढीव रक्कम दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना बोनसच्या स्वरूपात द्यावी, अशी भूमिका त्यांनी मांडली आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देण्यात आले असून, केंद्र सरकारच्या पातळीवरही या प्रस्तावाचा पाठपुरावा करण्याची विनंती करण्यात आली आहे.

ऊस उत्पादक शेतकऱ्यांना बोनसच्या माध्यमातून अतिरिक्त आर्थिक लाभ मिळण्याच्या धर्तीवर इतर पिकांच्या उत्पादकांनाही मदत मिळावी, हा या मागणीचा मुख्य उद्देश आहे. शेतकऱ्यांकडून खरेदी केलेल्या मालाच्या पुढील विक्रीतून अधिक उत्पन्न मिळत असेल, तर त्या वाढीव उत्पन्नाचा लाभ संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांनाही मिळायला हवा, असे खोतकर यांनी निवेदनात नमूद केले आहे.

नाफेडकडून शेतमाल खरेदी करताना शेतकऱ्यांना दिलेला दर आणि त्याच मालाच्या पुढील विक्रीतून मिळणारा दर यामध्ये फरक असू शकतो. बाजारभाव वाढल्यामुळे विक्रीतून अधिक उत्पन्न मिळत असल्यास त्याचा विचार शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यासाठी करावा, अशी मागणी खोतकर यांनी केली आहे.

मात्र, केवळ बाजारातील सध्याच्या दराच्या आधारे मदतीची रक्कम निश्चित न करता नाफेडने प्रत्यक्ष केलेल्या विक्रीचा आणि त्यातून मिळालेल्या उत्पन्नाचा अधिकृत हिशेब तपासावा, असेही त्यांनी सुचविले आहे. नाफेडने मागील हंगामात कोणत्या पिकाची किती खरेदी केली, त्यासाठी किती रक्कम खर्च झाली, संबंधित मालाची प्रत्यक्ष विक्री कोणत्या दराने झाली आणि साठवणूक, वाहतूक तसेच इतर आवश्यक खर्च किती झाला, याची माहिती संकलित करावी, अशी त्यांची मागणी आहे. मूळ खरेदी किंमत आणि आवश्यक खर्च वजा केल्यानंतर उरणारी संपूर्ण निव्वळ वाढीव रक्कम शेतकऱ्यांच्या मदतीसाठी वापरावी, असा या प्रस्तावाचा केंद्रबिंदू आहे. त्यामुळे नाफेडच्या खरेदी-विक्री व्यवहारांचा पीकनिहाय तपशील उपलब्ध करून त्यानुसार मदतीचे सूत्र निश्चित करण्याची गरज या मागणीतून अधोरेखित होते.

दुष्काळात शेतकऱ्यांना आर्थिक आधाराची गरज जालना जिल्ह्यासह दुष्काळाचा फटका बसलेल्या भागांतील शेतकरी उत्पादनातील घट आणि वाढत्या खर्चामुळे आर्थिक अडचणींचा सामना करत आहेत. पीक हातचे गेल्यानंतर कुटुंबाचा दैनंदिन खर्च भागविणे, मुलांचे शिक्षण, शेतीसाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड आणि पुढील हंगामाच्या पेरणीसाठी पैसा उभा करणे, अशी अनेक आव्हाने शेतकऱ्यांसमोर आहेत.

अशा परिस्थितीत उपलब्ध आर्थिक स्रोतांचा वापर करून शेतकऱ्यांना अतिरिक्त मदत देता येईल का, याचा शासनाने विचार करावा, अशी भूमिका खोतकर यांनी मांडली आहे. नाफेडच्या विक्रीतून मिळणाऱ्या वाढीव उत्पन्नाचा उपयोग दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी केल्यास संकटाच्या काळात त्यांना आर्थिक मदत मिळू शकते, असे त्यांनी नमूद केले आहे.

---

दिनकर घेवंदे यांच्या पाठपुराव्याला यश

# जालना रेल्वे स्थानकाच्या भुयारी मार्गावर दिवे बसविले

**जालना - प्रतिनिधी**

जालना रेल्वे स्थानक येथील भुयारी मार्गावर अखेर विद्युत दिवे बसविण्यात आले आहेत. या सुविधेसाठी दिनकर घेवंदे हे गेल्या अनेक दिवसांपासून सातत्याने मागणी व पाठपुरावा करीत होते. त्यांच्या मागणीला यश आल्याने नागरिक व प्रवाशांना दिलासा मिळाला आहे.



जालना रेल्वे स्थानक परिसरातील भुयारी मार्गावर प्रकाशाची योग्य व्यवस्था असावी, यासाठी दिनकर घेवंदे यांनी संबंधित प्रशासनाकडे वारंवार मागणी केली होती. भुयारी मार्गावर पुरेसा प्रकाश नसल्यामुळे प्रवाशांना ये-जा करताना अडचणींचा सामना करावा लागत होता. ही बाब लक्षात घेऊन त्यांनी या समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधले होते.

अखेर त्यांच्या मागणीची दखल घेत भुयारी मार्गावर विद्युत दिवे बसविण्यात आले. त्यामुळे या मार्गावर प्रकाशाची व्यवस्था उपलब्ध झाली असून, प्रवाशांना ये-जा करणे अधिक सोयीचे होणार आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी या सुविधेचा प्रवाशांना लाभ होण्याची अपेक्षा आहे.

---

# समान काम, समान वेतनासाठी न्यायालयीन कर्मचाऱ्यांचे आंदोलन तीव्र!

## *शासनाच्या वेळकाढू धोरणाविरोधात महाराष्ट्रभर काळ्या फिती लावून निषेध*

**जालना - प्रतिनिधी**

उच्च न्यायालयाच्या वेतनश्रेणीप्रमाणे दुय्यम न्यायालयांतील कर्मचाऱ्यांनाही वेतन लागू करावे, या मागणीसाठी महाराष्ट्रातील न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी शासनाविरोधात आंदोलन तीव्र केले आहे. समान काम, समान वेतनाच्या मागणीसाठी राज्यातील न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी १६ आणि १७ ऑक्टोबर रोजी काळ्या फिती लावून निषेध आंदोलन सुरू केले आहे. शासनाच्या वेळकाढू धोरणाचा निषेध करण्यासाठी आंदोलनाचा दुसरा टप्पा सुरू झाला आहे. याचाच एक भाग म्हणून जालना जिल्हा न्यायालयातही न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी काळ्याफिती



लावून निषेध आंदोलन केले. दुय्यम न्यायालयांतील कर्मचाऱ्यांना उच्च न्यायालयाच्या वेतनश्रेणीनुसार वेतन देण्याचा प्रस्ताव दीड वर्षांपासून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे प्रलंबित असल्याचा दावा कर्मचारी संघटनांनी केला आहे. शासनाकडून प्रत्यक्ष वेतनश्रेणी लागू करण्याऐवजी वेळकाढूपणा केला जात असल्याचा आरोपही संघटनांनी केला आहे. चारही महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघांनी यासंदर्भात संपाची नोटीस दिली आहे. आंदोलनाच्या पुढील टप्प्यात शनिवार, १७ ऑक्टोबर रोजी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांसमोर न्यायालयीन कर्मचारी एक दिवसाचे धरणे आंदोलन करणार आहेत. याच दिवशी राज्यभरातील कर्मचारी काळ्या फिती लावून काम करून शासनाच्या धोरणाचा निषेध नोंदवणार आहेत. त्यानंतर ५ नोव्हेंबर रोजी राज्यातील न्यायालयीन कर्मचारी एक दिवसाच्या सामूहिक रजेवर जाणार असून, १७ नोव्हेंबरपासून बेमुदत संपाचा इशाराही देण्यात आला आहे. शासनाने या मागणीकडे गांभीर्याने लक्ष न दिल्यास ठरलेल्या वेळापत्रकानुसार उपोषण, साखळी उपोषण, संप आणि बेमुदत संप करण्यात येईल, असा इशारा कर्मचारी संघटनांनी दिला आहे.

---

# महावितरणच्या निष्काळजीपणाने वजीरखेडा (भोकरदन) येथील शेतकऱ्याचा मृत्यू

## शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रवीण फुके पाटील यांची आक्रमक मागणी

**भोकरदन - प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यातील भोकरदन तालुक्यातील वजीरखेडा येथे एक अत्यंत धक्कादायक आणि चीड आणणारी घटना समोर आली आहे. महावितरण कंपनीच्या भोंगळ कारभारामुळे वजीरखेडा येथील कष्टकरी शेतकरी सचिन बाजीराव फुके (वय ४२ वर्षे) यांचा विजेचा तीव्र शॉक लागून जागीच दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेवरून महावितरणवर जोरदार हल्लाबोल करत,



शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रवीण फुके पाटील यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. ''महावितरणच्या बेजबाबदार आणि ढिसाळ कारभारामुळेच निष्पाप शेतकऱ्याचा नाहक बळी गेला असून, यासाठी कारणीभूत असणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर तात्काळ फौजदारी गुन्हे दाखल करा,''

अशी ठाम मागणी त्यांनी केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, वजीरखेडा येथील शेतकरी सचिन बाजीराव फुके (वय ४२) हे नेहमीप्रमाणे आपल्या शेतात काम करण्यासाठी गेले होते.

---

# जागतिक हात धुवा दिनाला जिल्हाभर उत्स्फूर्त प्रतिसाद; विविध ठिकाणी जनजागृती उपक्रम

**जालना - प्रतिनिधी**

जागतिक हात धुवा दिनानिमित्त जालना जिल्ह्यातील विविध ग्रामपंचायती, शाळा, अंगणवाड्या तसेच शासकीय कार्यालयांमध्ये हात धुण्याच्या योग्य पद्धतींबाबत जनजागृती उपक्रम राबविण्यात आले. या उपक्रमांना नागरिक, विद्यार्थी, शिक्षक, अंगणवाडी सेविका आणि ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्ण कांत कनवारिया यांनी जागतिक हात धुवा दिनानिमित्त जिल्हाभर जनजागृती मोहीम राबविण्याचे आवाहन केले होते. साबण आणि स्वच्छ पाण्याने योग्य पद्धतीने हात धुण्याची सवय प्रत्येकाने अंगीकारावी तसेच या सवयीचे महत्त्व समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचवावे, यासाठी विविध ठिकाणी जनजागृती करण्यात आली. या मोहिमेदरम्यान शाळा, अंगणवाड्या आणि ग्रामपंचायतींमध्ये हात धुण्याच्या योग्य पद्धतीचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. हातांचे तळवे, हातांची मागील बाजू, बोटांमधील जागा, अंगठे आणि नखांखालील भाग साबणाने व्यवस्थित चोळून किमान २० सेकंद हात धुण्याचे महत्त्व पटवून देण्यात आले. विद्यार्थ्यांना तसेच नागरिकांना दैनंदिन जीवनात स्वच्छतेच्या सवयींचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले.



साबण आणि स्वच्छ पाण्याने हात धुतल्याने अतिसार, पोटाचे विकार आणि विविध संसर्गजन्य आजारांचा धोका कमी करण्यास मदत होते. त्यामुळे जेवणापूर्वी, शौचालयाचा वापर केल्यानंतर तसेच अस्वच्छ वस्तूंना स्पर्श केल्यानंतर हात स्वच्छ धुणे आवश्यक असल्याचा संदेश या माध्यमातून देण्यात आला.

हा संदेश जिल्ह्यातील प्रत्येक घरापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या मोहिमेतून हातांच्या स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यावर भर देण्यात आला. हात धुण्याची सवय ही केवळ एका दिवसापुरती मर्यादित न ठेवता ती दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनवावी, असे आवाहन डॉ. कृष्ण कांत कनवारिया यांनी केले.

---

# स्व. प्रशांत नवगिरे सर यांच्या जयंतीनिमित्त दिव्यांग विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व भोजनाचे वाटप

## जागतिक विटी-दांडू दिनाचे औचित्य साधून नागेवाडी येथील अपंग निवासी विद्यालयात सामाजिक उपक्रम

**जालना | प्रतिनिधी**

स्व. प्रशांत नवगिरे सर यांच्या जयंतीदिनाचे औचित्य साधून तसेच जागतिक विटी-दांडू दिनानिमित्त १५ ऑक्टोबर रोजी नागेवाडी येथील अपंग निवासी विद्यालयात सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी विद्यालयातील दिव्यांग विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले, तसेच विद्यार्थ्यांना भोजन देऊन जयंती साजरी करण्यात आली. सामाजिक बांधिलकी जपत विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविणारा हा उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

स्व. प्रशांत नवगिरे सर यांच्या स्मृतींना उजाळा देत त्यांच्या जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांसोबत आनंदाचे क्षण साजरे करण्यात आले. शिक्षणाच्या प्रवाहात दिव्यांग विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे, त्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्य उपलब्ध व्हावे आणि समाजातील प्रत्येक घटकाने त्यांच्या पाठीशी उभे राहावे, या भावनेतून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. जयंती केवळ



औपचारिकरीत्या साजरी न करता समाजोपयोगी कार्यातून स्मृती जतन करण्याचा संदेशही या उपक्रमातून देण्यात आला.

कार्यक्रमादरम्यान अपंग निवासी विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. रमेश काकडेकर यांनी मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्याचे वाटप आणि भोजनाची व्यवस्था केल्याबद्दल त्यांनी आयोजकांचे कौतुक केले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना आनंद मिळतो, त्यांच्यात आत्मविश्वास वाढण्यास मदत होते आणि समाज आपल्यासोबत आहे, ही सकारात्मक भावना दृढ होते, असे त्यांनी आपल्या मनोगतातून सांगितले. विटी-दांडू संघटनेचे ट्रेझरर श्री. विजय गाडेकर यांनीही यावेळी मनोगत व्यक्त केले.

जागतिक विटी-दांडू दिनाच्या निमित्ताने पारंपरिक खेळाची ओळख जपण्यासोबतच सामाजिक कार्याला प्राधान्य देणे महत्त्वाचे असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. क्रीडा क्षेत्राशी संबंधित व्यक्तींनी सामाजिक उपक्रमांत सक्रिय सहभाग घेऊन गरजू विद्यार्थ्यांना मदतीचा हात द्यावा, अशी भावना या कार्यक्रमातून व्यक्त झाली. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्री. राजेश लहाने यांनी केले. या उपक्रमामुळे विद्यालयातील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य आणि भोजनाचा लाभ मिळाला. सामाजिक जाणीव, क्रीडाप्रेम आणि दिवंगत व्यक्तीच्या स्मृती जपण्याचा सुंदर संगम या कार्यक्रमातून अनुभवायला मिळाला.

यावेळी विद्या प्रशांत नवगिरे, विटी-दांडू संघटनेचे राज्याध्यक्ष गजानन पाटील वाळके, जिल्हाध्यक्ष बाप्पासाहेब म्हस्के, शालिनी तायडे, ऑल इंडिया विटी-दांडूचे आंतरराष्ट्रीय खेळाडू कदीर सय्यद, प्रदीप राठोड, विकास आढाव, अंकुश पवार, सुधाकर राठोड, रामचंद्र भिंगारदेवे, प्रतिक्षा नवगिरे, भार्गव नवगिरे, भारती नवगिरे, ओवी नवगिरे यांच्यासह मित्रपरिवार, विद्यालयातील शिक्षकवृंद आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

स्व. प्रशांत नवगिरे सर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित या उपक्रमातून सामाजिक संवेदनशीलतेचा आणि दिव्यांग विद्यार्थ्यांप्रती आपुलकीचा संदेश देण्यात आला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीला हातभार लावणारा हा उपक्रम उपस्थितांसाठी समाधानाचा आणि प्रेरणेचा ठरला.

---

# विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणाऱ्या उपक्रमांतून सामाजिक बांधिलकी जपली जाते - भास्कर दानवे

## *सेवा संकल्प अभियानांतर्गत जुना जालना येथे चित्रकला स्पर्धेचे आयोजन; विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग*

**जालना - प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त राबविण्यात येत असलेल्या सेवा संकल्प अभियानांतर्गत गुरुवार, दिनांक १५ ऑक्टोबर २०२६ रोजी जुना जालना येथील हिंदू समाज संस्था संचलित रामचंद्र किनगावकर प्राथमिक विद्यालय व बाबुराव जाफराबादकर माध्यमिक विद्यालय येथे चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या कार्यक्रमास भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मंडळ अध्यक्ष मोहन राऊत, नगरसेविका अनामिक पांगारकर, संस्थेचे उपाध्यक्ष श्री. रावसाहेबजी अवघड आप्पा, सचिव संजयजी देशपांडे, कोषाध्यक्ष श्री. जुगलकिशोरजी भक्कड, सदस्य भगवान धोत्रे, नितीन कोळेश्वर, जगदीश बडवे, विनायक दसरे तसेच सहसचिव चंद्रशेखर वाघमारे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

स्पर्धेदरम्यान विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर सुंदर चित्रे रेखाटून आपल्या कल्पकतेचे आणि कलात्मक कौशल्याचे दर्शन घडविले. निसर्ग, सामाजिक विषय



आणि सभोवतालच्या जीवनातील विविध पैलू चित्रांच्या माध्यमातून साकारत विद्यार्थ्यांनी आपल्या भावना व विचार प्रभावीपणे व्यक्त केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना आपली प्रतिभा सादर करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध झाले.

यावेळी बोलताना भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे म्हणाले की, ''प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये काही ना काही विशेष कलागुण दडलेले असतात. त्यांना योग्य व्यासपीठ, मार्गदर्शन आणि प्रोत्साहन मिळाल्यास ते आपल्या कर्तृत्वाच्या बळावर निश्चितच वेगळी ओळख निर्माण करू शकतात. शिक्षणासोबतच कला, संस्कार आणि सामाजिक जाणीव यांनाही तितकेच महत्त्व आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असून, सेवा संकल्प अभियानाच्या माध्यमातून समाजोपयोगी कार्याला प्रोत्साहन देण्याचा आमचा प्रयत्न आहे.''

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासोबतच त्यांच्यामध्ये आत्मविश्वास, सर्जनशीलता आणि सकारात्मक स्पर्धेची भावना निर्माण करण्यासाठी शालेय स्तरावर अशा उपक्रमांचे आयोजन महत्त्वपूर्ण ठरते. विद्यार्थ्यांना आपल्या कल्पना आणि विचार कलात्मक पद्धतीने मांडण्याची संधी मिळाल्याने त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासालाही चालना मिळते.

या चित्रकला स्पर्धेचे आयोजन भाजपा जुना जालना मंडळाचे अध्यक्ष श्री. मोहन राऊत यांच्या वतीने करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देणाऱ्या या उपक्रमातून सेवा संकल्प अभियानाचा सामाजिक बांधिलकी, जनसहभाग आणि समाजोपयोगी कार्याचा संदेश देण्यात आला.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६**, E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.